आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५

ठळक बातम्या

1. किसान सन्मान निधी योजनेला सहा वर्षे पूर्ण, पंतप्रधानांनी १९ वा हप्ता केला जारी; महाराष्ट्रातील नव्वद लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपुरात माहिती.
2. संपूर्ण जग भारताकडे आशेने बघत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं जागतिक गुंतवणूकदार परिषदेत प्रतिपादन.
3. नागपूर स्पोर्ट्स हब" मानकापूर येथे विहित वेळेत उभारणार असल्याची क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे याची माहिती.
4. विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (**VNIT**), मध्ये येत्या 28 फेब्रुवारी आणि 1 मार्च दरम्यान "विज्ञान आणि अभियांत्रिकी दृष्टीकोन असलेली भारतीय ज्ञान प्रणाली" या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदचे आयोजन.

-----------------------------------

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमधील भागलपूर येथून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेचा १९ वा हप्ता जारी केला. योजनेच्या ९.८ कोटी लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २२ हजार ७०० कोटी रुपयांहून अधिक मदत, थेट जमा करण्यात आली. पीएम-किसान योजनेच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आतापर्यंत सुमारे साडेतीन लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचले आहेत. हे माझ्यासाठी खूप समाधान आणि अभिमानाची गोष्ट आहे. आमचा हा प्रयत्न अन्नदात्यांसाठी आदर, समृद्धी आणि नवीन शक्ती देत असल्याच पंतप्रधानांंनी यावेळी सांगितल पंतप्रधानांनी बिहारमध्ये शेतकरी-संबंधित योजनांसह विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि लोकार्पण देखील केले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरातील वसंतराव नाईक कृषी विस्तार संस्था वनामती येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमांमध्ये बोलताना सांगितलं की पंतप्रधान कृषी सन्मान योजनेअंतर्गत **6** हजार रुपये तर मिळतच आहेत यामध्ये राज्य

शासनाच्या नमो कृषी सन्मान योजनेअंतर्गत **6** हजार रुपये आणि यात पुन्हा राज्य शासनातर्फे **3** हजार रुपये वाढ करून शेतकऱ्यांच्या खात्यात आता दरवर्षी **15** हजार रुपये जमा होतील .या योजनेच्या माध्यमातून शेतकरी उत्पादक संघ, छोटे शेतकरी यांना फायदा होत असून राज्य शासनाच्या शेतकऱ्यांना वीज बिल माफी, सौर पंप योजना या योजनांचा देखील लाभ राज्यातील लाखो शेतक-यांना होत असल्याचे त्यांनी सांगितलं.

*महाराष्ट्रातल्या नव्वद लाख शेतकऱ्यांना किसान सन्मान निधीचा हा हप्ता मिळालेला आहे देशाचे प्रधानमंत्री माननीय मोदीजी यांचे मी मनापासून आभार मानतो कि त्यांनी अशाप्रकारे किसान सन्मान निधी सुरु केला आणि तीन लाख कोटीपेक्षाही जास्त निधी आज देशातल्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये चाललेला आहे हा एक जगातला डी.बी.टी.चा रेकॉर्ड आहे.*

नागपुरातील आयोजित कार्यक्रमांमध्ये सावनेर तालुक्यातील नांदापूर येथील शेतकरी चंद्रशेखर ढोबळे यांनी पीएम किसान योजनेच्या त्यांना होणाऱ्या लाभा बद्दल सांगितलं

*१९वा हप्ता माझ्या खात्यात आला आहे आणि मी ते जे आहे. पैसे पी.एम. किसानचे ते मी बी बियाणे किंवा छोटे मोठे कीटकनाशके अजून अवजार वगैरे काही होत असते त्याच्यावर खर्च करतो म्हणजे केव्हाही कसा तो आमच्या खात्यामध्ये जमा राहतो आणि मग आम्हाला जेव्हाही गरज राहते तेव्हा विथड्रॉव करतो आणि काढतो आणि शेतीसंबंधित खर्च करतो.*

-----------------------------------

देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे स्पष्ट केले आहे की मंत्रालयांच्या तसेच मंत्री आस्थापनेवर विशेष कार्यकारी अधिकारी आणि खाजगी सचिव यांच्या **125** च्या जवळपास नावे मुख्यमंत्री म्हणून मान्यतेस आले होते त्यातील **109** नाव मान्य केली असून बाकीची नावे त्यांच्यावर असणाऱ्या भ्रष्टाचारांच्या आरोपात किंवा कुठल्या चौकशीच्या फेऱ्यात ते अडकले आहेत म्हणून अशा नावांना मी मान्यता दिली नाही.

नागपुरात आयोजित प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेच्या कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी आज बोलत होते. सौर ऊर्जेच्या वापराबाबत पसरत असलेल्या अफवां बद्दल त्यांनी स्पष्ट केलं की अशा कुठल्याही प्रकारचे वाढीव दर हे घरगुती

सोलर ऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांना किंवा पीएम सूर्य घरच्या लाभार्थ्यांना लागू होणार नाहीत.

------------------------------------

जागतिक गुंतवणूकदार परिषद

भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच संपूर्ण जग भारताकडे आशेने बघत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मध्यप्रदेशात भोपाळ इथं आज जागतिक गुंतवणूकदार परिषदेचं उद्‌धाटन त्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. भारत ही सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, असं जागतिक बँकेपासून सर्व महत्वाच्या संस्थाचं म्हणणं असल्याचं त्यांनी सांगितलं.

*भारत के इतिहास में ऐसा अवसर पहली बार आया है जब पूरी दुनिया भारत के लिए इतनी ऑप्टिमिस्टिक है। पूरी दुनिया में चाहे सामान्य जन हो, अर्थनीति के एक्सपर्टस हों। विभिन्न देश हो या फिर इंस्टीट्यूशंस, सभी को भारत से बहुत आशाएं हैं।*

जगाला भारताबद्दल वाटणाऱ्या खात्रीमुळे देशाचा आत्मविश्वास वाढला आहे, विकसित भारतात वस्त्रोद्योग, पर्यटन आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांना महत्व आलं आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. या तीनही क्षेत्रात सरकारनं परंपरिक कौशल्यावर भर देतानाच नवीन क्षेत्रानांही प्राधान्य दिल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. पंतप्रधानांनी यावेळी मध्यप्रदेशच्या औद्योगिक धोरणाचंही उद्घाटन केलं.

------------------------------------

नाशिक मुक्त विद्यापीठ

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक आकांक्षा पूर्ण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम निश्चित करतांना आर्थिक दुर्बल घटकातील पात्र तरुणांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात समाविष्ट करून घ्यावे, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. नाशिक येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 30व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. या दीक्षांत समारंभामध्ये पीएच.डी.,पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका अशा विविध प्रकारच्या **96** शिक्षणक्रमांतील **1** लाख **39** हजार **218** विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

------------------------------------

क्रीडा मंत्री- दत्तात्रय भरणे

नागपूरातील मानकापूर विभागीय क्रीडा संकुलात वसतीगृह, अद्ययावत जिम्नॅशियम सुविधा, प्रशासकीय इमारत, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा साहित्य, रेनवॉटर हार्वेस्टिंग, ग्रीन बिल्डींग अशा सुविधा उपलब्ध करून क्रीडा सुविधांचे "नागपूर स्पोर्ट्स हब" उभारण्यात येत आहे. हे स्पोर्ट्स हब पूर्णत्वाला नेण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही असे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज स्पष्ट केले. त्याचबरोबर "नागपूर स्पोर्ट्स हब" ची उभारणी विहित वेळेत करावी, कामचा दर्जा, गुणवत्ता यात कोणतीही तडजोड करू नये, असे निर्देशही भरणे यांनी दिले. आज मंत्रालयात "नागपूर स्पोर्ट्स हब"उभारणीबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीत ते बोलत होते.

-----------------------------------

परिषद

आधुनिक तंत्रज्ञाना सोबतच पारंपरिक भारतीय तंत्रज्ञान पद्धती जपणे महत्वाचे असून प्राचीन काळापासून अविरत सुरू असणारी भारतीय विज्ञान संस्कृती नव्या पिढीला कळणे गरजेचे आहे. यालाच अनुसरून विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (**VNIT**), नागपूर, मार्फत येत्या **28** फेब्रुवारी आणि **1** मार्च दरम्यान "विज्ञान आणि अभियांत्रिकी दृष्टीकोन असलेली भारतीय ज्ञान प्रणाली" या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदचे आयोजित करणार येणार असल्याची माहिती विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (**VNIT**), नागपूरचे संचालक प्रा. प्रेमलाल पटेल यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या परिषदेचे उद्घाटन जवाहरलाल नेहरू विद्यापीठ नवी दिल्लीचे माननीय कुलगुरू प्रा.संतीश्री धुलीपुडी पंडित, यांच्या हस्ते होणार असून उद्घाटन सत्राला प्रा.प्रेमलाल पटेल, **VNIT** नागपूरचे प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष मदभूषी मदन गोपाल यांचीही उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन **28** फेब्रुवारी शुक्रवार रोजी सकाळी **9.30** वाजता होईल.परिषदेचा मुख्य उद्देश आणि चर्चा ही पंचमहाभूते (पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू आणि अवकाश या पाच घटक) आणि त्यांच्या वैज्ञानिक आणि अभियांत्रिकी अनु-प्रयोगांभोवती राहणार आहे.

-----------------------------------

प्रसिद्धी मोहीम

भारतीय वायुसेना, नागपूर मध्ये **24** ते **26** फेब्रुवारी दरम्यान इंडक्शन पब्लिसिटी एक्झिबिशन वेहिकल या प्रचार वाहनाद्वारे तरुणांना भारतीय वायुसेनेमध्ये करिअर करण्याच्या हेतूने प्रेरित करण्यासाठी एक प्रसिद्धी मोहीम

राबवणार असून या  प्रचार वाहनाच्या माध्यमातून विद्यार्थी आणि वायुसेनेत करिअर करू इच्छिणाऱ्यांना वायुसेनेच्या शौर्य आणि  करिअर संधीबाबत माहिती मिळणार आहे.

------------------------------------

तलाव व पाणलोट क्षेत्राचे मोजमाप

शंभर वर्षांनंतर प्रथमच नागपूरच्या फुटाळा तलावाचा  मोजणी भूमी-अभिलेख विभागाच्या पथकाद्वारे केली जाणार आहे. तलावाच्या काही पाणलोट क्षेत्राचा  देखील मोजणी केली जाणार आहे.मोजणीच्या निष्कर्षांनुसार, अतिक्रमण हटवून सार्वजनिक बांधकाम विभाग (**PWD**) आणि महाराष्ट्र प्राणी व मत्स्य विज्ञान विद्यापीठ  सरकारी जागेचा ताबा घेईल.

------------------------------------